# ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

## १. बाजार समिती पदाधिकारी/अधिकारी प्रशिक्षण

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकरी आणि अधिकारी यांना प्रशिक्षण देण्याचे कामकाज कृषि पणन मंडळाने स्थापन केलेल्या राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे , जि. पुणे या संस्थेत प्रशिक्षण देण्याचे काम कृषि पणन मंडळामार्फत करण्यात येत आहे.

## २. कृषि पणन मित्र

कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्यास, कृषि पणन मित्र मासिक प्रसिध्द करण्यात येते.सदरचे मासिक प्रत्येक महिन्यास वर्गणीदार,कृषि उत्पन्न बाजार समिती, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, तालुका खरेदी- विक्री संघ, फळे व भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रीमंडळ, मंत्रालयीन सचिव, वृत्तपत्रे, कृषि मासिके, इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीतजास्त वर्गणीदार करणेसाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

सदर मासिकामध्ये, कृषि उत्पादन, पिक संरक्षण, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे व राज्य शासनाच्या विविध योजना, सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात. अहवाल वर्षात महिनानिहाय वितरीत अंकाची संख्या ;

| अ.क्र. | महिना | वितरीत अंक |
|---|---|---|
| १. | एप्रिल २०१३ | १४७९८ |
| २. | मे २०१३ २०१३ | १३४५४ |
| ३. | जुन २०१३ | १३४४० |
| ४. | जुलै २०१३ | १३४५४ |
| ५. | ऑगस्ट २०१३ | १२९४५ |
| ६. | सप्टेंबर २०१३ | १२४५६ |
| ७. | ऑक्टोबर २०१३ | १२२४६ |
| ८. | नोव्हेंबर २०१३ | १२२३८ |
| ९. | डिसेंबर २०१३ | १२०२९ |
| १०. | जानेवारी २०१४ | १३१९१ |
| ११. | फेब्रुवारी २०१४ | १३२०७ |
| १२. | मार्च २०१४ | १२७९५ |

सन २०१३-१४ या अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकाचे एकूण १९७० नविन वर्गणीदार झाले असून, कृषी पणन मित्र मासीकाचे सुमारे ३ लाख वाचक आहेत.

## ३. प्रदर्शन सहभाग

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांनी करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून याबाबतची माहिती विविध प्रदर्शनामध्ये सहभागी होवून कृषी पणन मंडळातर्फे संबंधितांना देण्यात येते. तसेच सदर प्रदर्शनामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू अहवाल वर्षात मंडळ खालील प्रदर्शनामध्ये सहभागी झाले ;

| अ.क्र. | प्रदर्शनाचे नांव | ठिकाण | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | राज्य स्तरीय बळीराजा कृषि प्रदर्शन | कळमनूरी , जि. हिंगोली | २५ ते २७ मे २०१३ |
| २. | ॲग्रोवन १३ | ॲग्रीकल्चर ग्राउंड, पुणे | २२ ते २६ नोव्हेंबर १३ |
| ३. | यशवंतराव चव्हाण कृषि औद्योगिक व पशूपक्षी प्रदर्शन | कराड, जि. सातारा | २४ ते २८ नोव्हेंबर १३ |
| ४. | चौथे ॲग्रो प्रोटेक, | कोलकत्ता | २८ ते ३० नोव्हेंबर २०१३ |
| ५. | चौथे ॲग्रो प्रोटेक, | कोलकत्ता | २८ ते ३० नोव्हेंबर २०१३ |
| ६. | किसान १३ | हिंदुस्थान एन्टिबायोटिक ग्राउंड, पिंपरी, जि. पुणे | ११ ते १७ डिसेंबर १३ |
| ७. | ग्लोबल कोकण | मुंबई | १४ ते १५ डिसेंबर १३ |
| ८. | राज्य पातळीवरील कृषि प्रदर्शन | पुसेगाव, जि. सातारा | ३० डिसेंबर १३ ते ३ जानेवारी २०१४ |
| ९. | अखिल भारतीय कृषि साहित्य संमेलन | नाशिक | २४ ते २६ जानेवारी १४ |
| १०. | ६ वे ॲग्रोव्हिजन/कृषि वसंत | नागपूर | ९ ते १३ फेब्रुवारी १४ |

## ४. जाहिरात व आर्थिक मदत

| अ.क्र. | संस्थेचे नांव/मासिकाचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | श्री. सेवागिरी देवस्थान ट्रस्ट , पुसेगाव, जि सातारा | १.०० लाख |
| २. | किसान कृषि विकास प्रतिष्ठान , गेवराई | १५,०००/- |
| ३. | अखिल भारतीय लिंबू उत्पादक | १५,०००/- |
| ४. | कराड कृषि उत्पन्न बाजार समिती (कृषि औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शन) | ५.०० लाख |
| ५. | अखिल भारतीय कृषि साहित्य संमेलन | ३.०० लाख |

## ५. प्रसिद्धी

कृषि पणन मंडळातर्फे विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रदर्शन, चर्चासत्र, इतर अनुषंगिक कार्यक्रम व पत्रकार परिषद आयोजित केल्या जातात. मा. अध्यक्ष कृषि पणन मंडळ यांच्या पत्रकार परिषद, प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात येते.

## ६. लेख प्रसिध्दी

कृषि पणनाशी संबंधित माहिती शेतकरी, सह. संस्था, शास्त्रज्ञ, अधिकारी, पदाधिकारी, विस्तार कार्यकर्ते यांचेमार्फत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळ सतत प्रयत्नशिल आहे. कृषी पणनाशी संबंधित माहितीवर आधारित विविध लेख अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकात प्रसिध्द करण्यात आले असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे;

| अ.क्र. | लेखाचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १. | आंबा फळाची पक्वता तपासणी, काढणी व हाताळणी | एप्रिल २०१३ |
| २. | पेरु प्रक्रिया | एप्रिल २०१३ |
| ३. | सोयाबीन- विविध अन्न प्रक्रिया उद्योग | एप्रिल २०१३ |
| ४. | आंबा निर्यात- थोडासा भूतकाळ व सद्यस्थिती : भविष्यातील गरजा | एप्रिल २०१३ |
| ५. | थेट भाजीपाला विक्री | मे २०१३ |
| ६. | रब्बी कांद्याची काढणी, हाताळणी व साठवणूक | मे २०१३ |
| ७. | चिंच प्रक्रिया आणि मूल्यवर्धन | मे २०१३ |
| ८. | अन्नप्रक्रियेसाठी टोमॅटो लागवड | जून २०१३ |
| ९. | आल्यापासून सुंठ बनविणे फायदेशीर | जून २०१३ |
| १०. | कृषि उत्पादनासाठी विपणनाच्या नवीन पर्यायी व्यवस्था | ऑगस्ट २०१३ |
| ११. | खरीप पिकांच्या बाजारभावाचे अंदाज | ऑगस्ट २०१३ |
| १२. | कृषि निर्यात अभियान राबवा | ऑगस्ट २०१३ |
| १३. | टोमॅटो प्रक्रिया | ऑगस्ट २०१३ |
| १४. | सोयाबिन – प्रक्रिया आणि लघुउद्योग | ऑगस्ट २०१३ |
| १५. | पर्यावरण, कृषी उद्योग आणि अन्नधान्य सुरक्षितता | ऑगस्ट २०१३ |
| १६. | शेतक-यांची व ग्राहकांची व्यापा-यांच्या जाचातून सोडवणूक | सप्टेंबर २०१३ |
| १७. | महाराष्ट्रातील फूलशेती आणि बाजार व्यवस्थापन | सप्टेंबर २०१३ |
| १८. | कृषिमाल प्रक्रियाउद्योग | सप्टेंबर २०१३ |
| १९. | काजू प्रक्रिया उद्योग – काळाची गरज | सप्टेंबर २०१३ |
| २०. | सीताफळ प्रक्रिया | ऑक्टोबर २०१३ |
| २१. | मिनी डाळमिल शेतक-यांसाठी वरदान | ऑक्टोबर २०१३ |
| २२. | भाजीपाला उत्पादन व विक्री व्यवस्थापन - सद्यस्थिती | नोव्हेंबर २०१३ |
| २३. | फळांचे काढणीनंतरचे व्यवस्थापन – एक दृष्टिकोन | नोव्हेंबर २०१३ |
| २४. | फळ प्रक्रिया – विविध व्यापार संधी | नोव्हेंबर २०१३ |
| २५. | शेतीमाल उत्पादनात ‘ भारतीय ब्रँड ’ चे महत्व | नोव्हेंबर २०१३ |

| अ.क्र. | लेखाचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| २६. | " उत्पादक ते ग्राहक" अभियानांतर्गत शहरांमध्ये थेट भाजीपाला विक्री केंद्र – ग्राहकाभिमुख चळवळ | डिसेंबर २०१३ |
| २७. | प्रक्रियायुक्त पदार्थांचे मार्केटिंग | डिसेंबर २०१३ |
| २८. | ग्लोबलगॅप प्रमाणीकरण | डिसेंबर २०१३ |
| २९. | प्रक्रियेसाठी पेरु लागवड | जानेवारी २०१४ |
| ३०. | महाराष्ट्र राज्य आंबा व काजू मंडळ प्रगतीची दिशा | फेब्रुवारी २०१४ |
| ३१. | शेतकरी ते ग्राहक – भाजीपाला विक्री व्यवस्थापन | फेब्रुवारी २०१४ |
| ३२. | केळी व्यवस्थापन व प्रक्रिया | फेब्रुवारी २०१४ |
| ३३. | रब्बी कांदा लागवड | फेब्रुवारी २०१४ |
| ३४. | फळे व भाजीपाला : विक्रीपूर्व प्रतवारी आणि पॅकिंगचे महत्व | मार्च २०१४ |
| ३५. | उन्हाळी भाजीपाला लागवड तंत्रज्ञान | मार्च २०१४ |
| ३६. | फळे व भाजीपाला प्रक्रियेत सुरक्षितता महत्वाची | मार्च २०१४ |

## ७. दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग

कृषि पणन मंडळ दूरदर्शन मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम, यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

## ८. प्रशिक्षण

कृषि पणन मंडळात कार्यालयीन कामकाजाचे शनिवारी अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी विविध विषयातील तज्ञांचे व्याख्यान/विचार/मंथन/मार्गदर्शन/प्रात्यक्षिके इ. आयोजित करण्यात येतात. या प्रशिक्षणास कर्मचा-यांना उत्तम प्रतिसाद लाभत आहे. या उपक्रमांमुळे अधिकारी व कर्मचारी यांचे ज्ञानात भर पडत असून प्रशिक्षणामुळे कामकाजामध्ये गतीमानता आणण्यास मदत होत आहे. कार्यालयीन कामकाजामध्ये माहिती अधिकारात अनेक गोष्टींची माहिती मागविली जाते व ते माहिती अधिकार अवगत होणेसाठी दिनांक १५/२/२०१४ रोजी यशदाकडून माहिती अधिकाराबाबत एक दिवशीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

## ९. कृषि वसंत

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी निमित्त केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय औद्योगिक महासंघ (CII) यांच्या सहकार्याने दिनांक ९ ते १३ फेब्रुवारी २०१४ या कालावधीत केंद्रीय कापूस संशोधन केंद्र , नागपूर येथे कृषि वसंत या भव्य राष्ट्रीय स्तरावरील प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रदर्शनात पणन मंडळ सहभागी झाले होते. प्रदर्शनात येणा-या अभ्यांगतांना पणन मंडळाच्या योजनांची , प्रकल्पांची माहिती देण्यात आली. कृषि पणन मित्र अंकाचे वर्गणीदार करुन घेण्यात आले.

## ११. कोलकत्ता प्रदर्शन

कोलकत्ता येथे दिनांक २८ ते ३० नोव्हेंबर २०१३ या दरम्यान ४ थे ॲग्रो प्रोटेक २०१३ प्रदर्शन इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स कोलकत्ता यांनी मिलम मेला ग्राउंड व आय.टी. सोनार येथे आयोजन केलेले होते.सदर प्रदर्शनात महाराष्ट्र राज्याचे कृषि व पणन खाते हे principal Partner State म्हणून सहभागी झाले होते.

# ग्रंथालय

कृषि पणन मंडळातील अधिकारी / कर्मचारी तसेच पणन मंडळाशी संबंधित सर्व संस्था, तज्ञ, शास्त्रज्ञ, विस्तार कार्यकर्ते, पदाधिकारी यांना कृषी, पणन, आयात, निर्यात,तंत्रज्ञान, नवीन संशोधन इ. बाबतची नवनवीन माहिती / संशोधन/ जागतिक घडामोडी समजाव्यात, त्याचा तपशिल प्राप्त व्हावा यासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ग्रंथालय सुरु करण्यात आले आहे. ग्रंथालयात विविध विषयांवरील पुस्तके, संशोधनपर मासिके, अहवाल, सी. डी., प्रकल्प अहवाल इ. उपलब्ध असून त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे.

तसेच दरवर्षी विविध विषयांवरील पुस्तके ग्रंथालयात येत असून कृषि पणन, निर्यात इ. विषयांवरील राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय स्तरावरुन प्रसिध्द होणारी मासिके, त्रैमासिके, नियतकालिके ग्रंथालयात येतात ;

### ग्रंथालयातील पुस्तकांची सद्यस्थिती

एकूण पुस्तके : ३८३०, मासिके - मराठी : १० इंग्रजी : ०६

ग्रंथालय नवनवीन पुस्तकांची खरेदी करुन अधिकाधिक माहितीपूर्ण आणि आधुनिक करण्याचा सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच विविध विषयांवरील वृत्तपत्रांमध्ये / मासिकांमध्ये प्रसिध्द झालेल्या लेखांचे विषयावार संकलन ग्रंथालयात करण्यात येते. इंटरनेटवरुनही विविध विषयांवरील माहिती आवश्यकतेनुसार पणन मंडळातील अधिका-यांना उपलब्ध करुन देण्यात येते. ग्रंथालय विभागामार्फत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲन्ड ॲग्रीकल्चर इ. विविध संस्थांचे सभासदत्व प्राप्त करुन घेण्यात आले आहे. ग्रंथालयात दररोज १५ दैनिके येत असून या दैनिकांमधून विविध विषयांवरील कात्रण काढून त्यांचेही विषयावर संकलन करण्यात येते.